# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com

▶ वर्ष-२ ■ अंक-४४ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २९ मे २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669



आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूजची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com


# दिव्यात नालेसफाईकडे अक्षम्य दुर्लक्ष

## आयुक्तांच्या आदेशाला स्थानिक प्रशासनाकडून हरताळ!







## दिवा शहरातील अनेक नाल्यात आजही गाळ तसाच!

दिवा:- दिवा शहरात नालेसफाईकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले असून अनेक नाले तुंबलेले, काही ठिकाणी वरवरचा कचरा काढला गेला,गाळ मात्र तसाच असल्याने येथील नालेसफाईच्या कामाची पोलखोल झाली आहे.

दिव्यात नालेसफाई करताना नाल्यातील गाळ काढून नाल्याचे खोलीकरण अपेक्षित असताना सुद्धा नालेसफाई च्या नावाने केवळ दिखावा करण्यात आला आहे.अनेक भागात नाल्यातील कचरा काढून तो नाल्याच्या बाजूला ठेवण्यात आला असून हा कचरा उचलला न गेल्याने पावसात पुन्हा तो कचरा नाल्यात पडण्याची शक्यता आहे.दिवा शहरातील प्रमुख नाले आणि अंतर्गत गटारे अद्यापही पूर्णतः साफ करण्यात आली नसून पालिका प्रशासन नेमकं काय काम करत आहे असा सवाल शहरातील जनता विचारत आहे.एकीकडे पालिका आयुक्त शंभर टक्के नालेसफाई झाली पाहिजे म्हणून आदेश देत असताना दिव्यात मात्र प्रशासन मनमानी कारभार करत असल्याचे एकंदरीत नालेसफाईच्या कामावरून स्पष्ट होत आहे. दिव्यातील नालेसफाईची पालिका आयुक्तांनी चौकशी करावी अशी मागणी आता नागरिक करत आहेत.

**सं|पा|द|की|य**

# दिवा शहरात सार्वजनिक शौचालय होण्यासाठी २०२३ उजडावे लागले...

## आयुक्तांनी शहराच्या गरजा ओळखणारे अधिकारी दिव्याला द्यावे!

दिव्यात पहिलं सार्वजनिक शौचालय व प्रसाधनगृह होण्यास २०२३ साल उजाडते ही बाब या शहराची पालक संस्था असणाऱ्या ठाणे महानगरपालिकेला नक्कीच भूषणावह नाही.आजूबाजूला असणाऱ्या ठाणे, मुंबई,डोंबिवली, नवी मुंबई या शहरात नाक्या नाक्यावर नागरिकांच्या सोयीसाठी सार्वजनिक शौचालय उभारली गेली.दिवा शहरात मात्र या छोट्या छोट्या गोष्टी होण्यास इतका उशीर का लागतो?याचा विचार पालिका प्रशासनाने करायला हवा. आम्ही नेहमी सांगतो, ठाण्यात बसणारे पालिका प्रशासनाचे प्रमुख आणि पालिका चालविणारे दिव्याला कायम गृहीत धरतात.या शहराला नीटनेटके बनविण्याची भूमिका आणि धोरण महापालिका प्रशासनाकडे दिसत नाही. मागे दिवा शहरात आठ दिवस वीज नसल्याने नागरिक हैराण होते.वीज पुरवठा करणारा ट्रान्सफॉर्मर बिघडला होता.आठ दहा दिवसाने ट्रान्सफॉर्मर दिव्यात आला...लोकांनी अक्षरशः त्या ट्रान्सफॉर्मरची मिरवणूक काढली. असं चित्र दुसऱ्या कुठल्याही शहरात दिसणार नाही. वेळेत लोकांच्या समस्या सुटत नसल्याने किंवा आपल्या समस्या प्रशासन सोडवेल हा विश्वास लोकांना नसल्याने त्यात थोडासा जरी दिलासा मिळाला तरी लोकं जल्लोष करतात.येथील जनतेच्या अपेक्षा किती माफक आहेत हे प्रशासनाने समजून घ्यायला हवे.शहरातील सर्वसामान्य नागरिकांची छोट्या छोट्या गोष्टी साठी होणारी पिळवणूक थांबवायला हवी. नुकतेच मनसेने गणेश पाडा येथील एका धोकादायक गटाराच्या दुरुस्तीसाठी पाठपुरावा करून ते गटार दुरुस्त करून घेतले.एकदाचे ते गटार दुरुस्त झाले...लोकांना समाधान वाटले. पण एखादं गटार धोकादायक आहे हे पालिका प्रशासनाला स्वतःहून दिसत नाही.लोकांनी तक्रार केल्यानंतर तातडीने त्यावर उपाययोजना करण्याची जबाबदारी पालिका प्रशासनाची नाही?असायला हवी. पालिकेने स्वतःच्या जबाबदाऱ्या नीट पार पाडल्या तर नागरिकांना त्रास होणार नाही. दिवा शहर नीटनेटके होण्यासाठी पालिकेच्या अभ्यासू लोकांनी या शहरात लक्ष घालायला हवं. जे अधिकारी फक्त पाट्या टाकायचे काम करतात, हजेरी लावून नुसते दिवस भरतात त्यांची येथून उचलबांगडी करायला हवी.शहराच्या, येथील नागरिकांच्या प्राथमिक गरजा काय याकडे प्रशासनाने लक्ष द्यायला हवं. तसं झालं तर शहरातील नागरिकांना भेडसावणारे छोटे छोटे प्रश्न देखील मोठे वाटणार नाहीत.वेळेत प्रश्न सुटल्याने नागरिकही समाधान व्यक्त करतील.

# वीज चोरांना आता बसणार झटका

**ठाणे:** टोरंट पॉवरने कळवा-मुंब्रा-शीळ भागात वीजचोरी करणाऱ्यांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे. वीज जोडणी नियमित करण्यासाठी विविध माध्यमांतून अनेकदा आवाहन करूनही लोक नवीन वीज जोडणीसाठी अर्ज करण्यासाठी पुढे येत नाहीत.

या भागातील १५ हजारांहून अधिक घरे पीडी थकबाकीच्या नावाखाली बेकायदेशीर वीज वापरत आहेत. अशा ग्राहकांनी त्यांची प्रलंबित पीडी देय रक्कम भरून कायदेशीररित्या वीज मीटर मिळवावेत असे आवाहन टोरंट पॉवर कंपनीने केले आहे. मात्र कायदेशीर कनेक्शनसाठी लोक पुढे येत नाहीत.

आजही सुमारे २१५०० कनेक्शन्स ० किंवा खूप कमी युनिट वापर दर्शवतात. यातील अनेकांचे मीटर सदोष असल्याचा किंवा मीटरमध्ये छेडछाड केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. अशा लोकांचे मीटर त्वरित बदलणे आवश्यक आहे.

> **टोरंट पॉवरने वीजचोरांवर एफआयआर दाखल केले**

अशा वीजचोरांमुळे नियमित वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांचा वीजपुरवठा अनेकदा खंडित होत आहे. त्यांना लाइन ट्रिपिंग आणि नेटवर्क बिघाडाचा सामना करावा लागतो. टॉरंट कंपनीने नुकतीच मीटरमध्ये छेडछाड आणि वीजचोरीविरोधात कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. गेल्या काही दिवसांपासून पोलिसांत वीजचोरीचे अनेक गुन्हे दाखल झाले आहेत.

वीजचोरी हा कायदेशीर गुन्हा असून वीजचोरी करणाऱ्यांवर कंपनी कडक कायदेशीर कारवाई करत असल्याचे कंपनीचे जनसंपर्क अधिकारी म्हणाले की, मीटरशिवाय वीज वापरणे म्हणजे वीजचोरी असून कमी वीज बिलासाठी वीज मीटरमध्ये छेडछाड करणे हीदेखील वीजचोरी आहे. विद्युत कायदा, २००३ नुसार, वीज चोरी हा कायदेशीर गुन्हा आहे, ज्यासाठी तीन वर्षांपर्यंत कारावास किंवा दंड होऊ शकतो.

# 'महिला आयोग आपल्या दारी'अंतर्गतच्या जनसुनावणीत १७४ तक्रारींवर सुनावणी

## - अध्यक्षा रुपाली चाकणकर

**ठाणे:** महिलांच्या तक्रारींवर तातडीने न्याय देण्यासाठी तसेच कौटुंबिक हिंसाचार, बालविवाह, माता व बाल मृत्यू आदी प्रकार रोखण्यासाठी महिला आयोग कार्यरत आहे. 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमाअंतर्गत ठाणे जिल्ह्यात मंगळवारी पार पडलेल्या जनसुनावणीमध्ये जिल्ह्यातून १७४ तक्रारी प्राप्त झाल्या असून या सर्वांच्या तक्रारींवर तातडीने सुनावणी घेऊन संबंधित विभागांना त्याचे निराकरण करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याची अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी ठाण्यात दिली.

महिलांच्या तक्रारींवर सुनावणी करून त्यांना न्याय देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या महिला आयोग आपल्या दारी उपक्रमाअंतर्गत आज ठाण्यात आयोगाच्या अध्यक्षा चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली जनसुनावणी घेण्यात आली. यावेळी आयोगाच्या सदस्य गौरी छाब्रिया, उत्कर्षा रुपवते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल, अतिरिक्त



जिल्हाधिकारी मनीषा जायभाये, अतिरिक्त पोलीस आयुक्त पंजाबराव उगले, पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी महेंद्र गायकवाड, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलाश पवार, ठाणे महापालिका उपायुक्त गोदापुरे आदी उपस्थित होते. या जनसुनावणीमध्ये जिल्ह्यातून एकूण १७४ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यामध्ये ११६ तक्रारी या वैवाहिक/ कौटुंबिक समस्यासंदर्भातील होत्या. तर १८ तक्रारी सामाजिक समस्येच्या, ९ तक्रारी मालमत्ता विषयक, ५ तक्रारी या कामाच्या ठिकाणी होणाऱ्या त्रासाच्या आणि इतर विषयाच्या २६ तक्रारी दाखल झाल्या होत्या. या तक्रारींवर पाच पॅनेलच्या माध्यमातून जागेवरच सुनावण्या घेण्यात आल्या.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.




# ठाण्यात रस्ता खचला

**ठाणे:** वागळे इस्टेट, रोड नंबर २२ च्या इंदिरानगर या ठिकाणी कलवट जवळचा रस्ता खचल्याची घटना शुक्रवारी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसली तरी, घटनास्थळी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून धोकापट्टी बांधण्यात आली आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन , सार्वजनिक बांधकाम विभाग (वागळे प्रभाग समिती) व अग्निशमन दल या विभागांनी धाव घेतली होती.

# घोडबंदर रोडवर केमिकल टँकर उलटला

**ठाणे:** टॉल्युएन केमिकल घेऊन जाणारा टँकर घोडबंदर रोड वरील पातलीपाडा ब्रीजखाली उलटल्याची घटना शुक्रवारी मध्यरात्री पावणे दोन वाजण्याच्या सुमारास समोर आली. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही. मात्र यामुळे वाहतूककोंडी झाल्यानेती पूर्वपदावर येण्यासाठपहाटे चार वाजले. जेएनपीटी येथून गुजरात सुरत येथे २५ टन वजन केमिकल टँकर घेऊन टँकर चालक महोम्मद साकिर हा घोडबंदर रोड मार्गे निघाला होता. पातलीपाडा ब्रिजजवळ येतात चालकाचा टँकरवरील ताबा सुटला आणि टँकर उलटून अपघात झाला. ही घटना मध्यरात्री १ वाजून ५० मिनिटांच्या सुमारास घडली. याची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी,चितळसर पोलीस , शहर वाहतूक पोलीस, एमएमआरडीए कर्मचारी तसेच अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**




# दिवा टर्निंग येथील सार्वजनिक शौचालयाचे शिवसेनेतर्फे लोकार्पण



**दिवा:-** दिवा टर्निंग येथे उभारण्यात आलेल्या सार्वजनिक शौचालयाचे उद्घाटन शनिवारी शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत पार पडले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व कल्याण लोकसभेचे खासदार डॉ.श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या पाठपुराव्याने दिवा शहरामध्ये दिव्यातील नागरिकांच्या सोयसुविधासाठी दिवा टर्निंग येथे नवीन शौचालयचे उभारण्यात आले आहे. या शौचालयाचे उद्घाटन २७ रोजी दिवा शिवसेना शहर प्रमुख व माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या हस्ते पार पडले.यावेळी माजी नगरसेवक शैलेश मनोहर पाटिल,अमर ब्रम्हा पाटिल, दिपाली उमेश भगत,आदेश भगत,सुनिता गणेश मुंडे,दिपक जाधव,दर्शना म्हात्रे,गणेश मुंडे,उमेश भगत, भालचंद्र भगत,निलेश पाटिल,गुरुनाथ पाटिल,यांसह दिवा शिवसेना शहराचे विभागप्रमुख,उपविभागप्रमुख ,शाखाप्रमुख ,उपशाखाप्रमुख ,गटप्रमुख उपस्थित होते.

# दिव्यातील स्मशानभूमीत अंत्यविधी साठी पाणी व्यवस्था न केल्यास भाजप आंदोलन करेल

## रोहिदास मुंडेंचा इशारा

**दिवा:- दिवा शहरातील स्मशानभूमी मध्ये पाणी व्यवस्था नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे.ही गैरसोय लक्षात घेऊन येथील स्मशानभूमीत पालिकेने पाणीपुरवठा उपलब्ध करून द्यावा अशी मागणी भाजपचे दिवा अध्यक्ष रोहिदास मुंडे यांनी केली आहे.**

दिव्यात पाणी नाही हे दिव्यातील लोकांच्या पाचवीला पुजलेले आहे. दिवा विभागात कित्येक वर्ष पाण्याची कृत्रिम टंचाई आहे. दिवा विभागाला पुरेसे पाणी उपलब्ध असताना सुद्धा दिव्यातील लोक पाण्यासाठी वणवण करताना दिसतात. जिवंतपणे लोकांना येथे पुरेसे पाणी मिळत नाही. टँकरने पाणी विकत घेऊन जीवन जगाव लागत आहे. परंतु मेल्यानंतर ज्या स्मशानभूमीत आपण अंत्यविधी करत असताना मयताला आपण पाणी देतो. परंतु त्या पाण्यासाठीही तिथे लोकांना वणवण करावे लागते यापेक्षा दुसरी शोकांतिका काय? असा सवाल भाजपचे दिवा मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांनी केला आहे.

आज दिव्यात आगासन,बेतवडे, म्हातार्डी, दातिवली, दिवा ,साबे या ठिकाणी ठाणे महानगरपालिकेच्या पूर्वीच्या स्मशानभूमी आहेत. परंतु आज ३५ वर्षांपेक्षा जास्त कार्यकाल ठाणे महानगरपालिकेत ही गाव असून सुद्धा अजून या महापालिकेच्या स्मशानभूमीत पाण्याच्या लाईन देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे येथे स्मशानात येताना लोकांना हातामध्ये पाण्याचे कॅन घेऊन स्मशानात येऊन विधी पूर्ण करावी लागतात. ही महापालिकेसाठी लज्जास्पद गोष्ट आहे, ज्या दिवा भागातून करोडो रुपये महसूल वसूल केला जातो, परंतु ज्या नागरिकांसाठी लागणाऱ्या गोष्टी आहेत, त्याकडे मात्र महापालिका जाणून-बुजून दुर्लक्ष करते असा आरोप रोहिदास मुंडे यांनी केला आहे.दिवा विभागातील सर्व स्मशानभूमीला तातडीने पाण्याच्या लाईन देण्यात याव्यात अन्यथा दिवा भाजप तर्फे आंदोलन करण्यात येईल असे मुंडे यांनी म्हटले आहे. या संदर्भात ठाणे महानगरपालिका आयुक्तांशी चर्चा करणार असल्याचे मुंडे यांनी म्हटले आहे.





# आई गांवदेवी चिचुआई मंदिर जिर्णोध्दार सोहळा संपन्न

**दिवा:-** साबेगाव येथील आई गांवदेवी चिचुआई मंदिर जिर्णोध्दार सोहळा नुकताच पार पडला. सतत तिन दिवस चाललेल्या सोहळ्याला पहिल्या दिवशी विधीवत होम हवन व सायंकाळी भजन तसेच दुसऱ्या दिवशी पुन्हा होम हवन विधी व सायंकाळी गावदेवीची पालखी मिरवणूक काढण्यात आली.

या मिरवणूकीत गुलाल उधळत वाद्यमय आनंदी वातावरणात समस्त ग्रामस्थ सहभागी झाले होते. तर तिसऱ्या दिवशी जिर्णोध्दार विधी पुजन करण्यात आले. सतत तिन दिवस चालणाऱ्या या सोहळ्याची सांगता महाप्रसादाने झाली. या प्रसंगी समस्त ग्रामस्थ तसेच बाहेरुन आलेले भक्तगण प्रचंड संख्येने उपस्थित होते.

# अखेर घोडबंदर परिसरातील मुख्य नाल्यावरील अतिक्रमण हटविले

## पालिकेने घेतली दोन दिवसात दखल







## कापूरबावडी येथील पुलाच्या खाली असलेल्या नाल्याचे अतिक्रमणही हटविले

**ठाणे:** घोडबंदर रोडवरील नागलाबंदर परिसरात असलेल्या महापालिकेच्या मुख्य नाल्यात भूमाफियांनी डेब्रिजचा भराव टाकून नैसर्गिक नाल्याचे पात्र बंद करत अतिक्रमण केल्याचा प्रकार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने शुक्रवारी उघडकीस आणला होता. अवघ्या दोन दिवसात पालिकेला जाग आली असून प्रशासनाने याची दखल घेत हा नाला अतिक्रमण मुक्त केला आहे. त्यामुळे पावसाळ्यात घोडबंदर रोडवर होणारी पूरजन्य परिस्थिती टळू शकणार आहे.

घोडबंदर परिसरात गायमुख आणि नागला बंदर येथे महापालिकेचे मुख्य नाले आहेत. या नाल्यांचे आरसीसी बांधकाम न केल्यामुळे ते आजही खुले आहेत. या नाल्यांवर भूमीमाफीयांनी कब्जा करून नाल्याच्या प्रवाहात डेब्रिजचा भरणा करण्यात आला होता. या अतिक्रमणामुळे आणि टाकलेल्या डेब्रिजमुळे घोडबंद मार्गावर पूरजन्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता होती. या विषयासंदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जनहित व विधी विभागाचे शहर अध्यक्ष स्वप्निल महिंद्रकर यांनी पत्रव्यवहार केला होता. या पत्राच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी करून त्या संदर्भात महानगरपालिकेचे नगरअभियंता यांना पत्राद्वारे नाल्याच्या परिस्थितीचा अहवाल दिला होता. अखेर मंगळवारी महानगरपालिकेच्या आयनडीपी विभाग आणि माजीवाडा मानपाडा प्रभाग समितीच्या संयुक्त विद्यमानाने हा नाला अतिक्रमण मुक्त करण्यात आला. या नाल्याच्या अतिक्रमणाच्या विषयी महिंद्रकर यांनी ठाणे महानगरपालिका प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभाग प्रशासन यांच्या निदर्शनास आणून दिली. सार्वजनिक बांधकाम विभाग प्रशासनाने महानगरपालिकेला या अतिक्रमणासंदर्भात पत्रव्यवहार केल्यानंतर महानगरपालिकेच्या संबंधित विभागाला जाग आली असून अखेर नैसर्गिक नाला खुला झाला. तसेच कापूरबावडी येथील पुलाच्या खाली असलेल्या मुख्य नाल्यांमध्ये झालेले अतिक्रमण देखील हटवण्यात आले आहे.

> ***"महानगरपालिका क्षेत्रात नाले तुंबून दुर्घटना होण्याचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. ठाणे शहरातील मुख्य नाल्यांची निगा व देखभाल करण्याचे काम आयएनडीपी विभागाचे आहे, त्यांनी ते योग्य रित्या केले पाहिजे. जेणेकरून पावसाळ्यात नाल्यामुळे ठाणेकरांना पूरजन्य परिस्थितीचा सामना करावा लागू नये.''***
> ***– स्वप्नील महिंद्रकर,*** *ठाणे शहराध्यक्ष जनहित व विधी विभाग मनसे*

# पर्यटकांना सुरक्षा साधने न दिल्यास ठेकेदारांची बोटिंग सेवा होणार बंद

## आयुक्त अभिजीत बांगर यांचा इशारा

**ठाणे:** ठाणे शहरातील विरंगुळ्याचे ठिकाण म्हणजे मासुंदा तलाव. सध्या शाळांना असलेल्या सुट्टयांमुळे बोटिंग सुविधा उपलब्ध असलेल्या तलावांवर सायंकाळच्या वेळेस नागरिकांची गर्दी पाहायला मिळते. मासुंदा, उपवन, आंबे-घोसाळे व खारीगांव या तलावांवर महापालिकेच्यावतीने बोटींग सुविधा उपलब्ध असून याचा लाभ आबालवृद्ध घेत आहेत. बोटिंग करताना आवश्यक ती काळजी घेऊन सुरक्षेची साधने नागरिकांना उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे, जेणेकरुन अपघात होवून दुर्देवी घटना घडणार नाही, याकामी नियुक्त ठेकेदाराकडे सुरक्षा साहित्य उपलब्ध असताना देखील ते वापरले जात नाही किंबहुना मर्यादेपक्षा जास्त पर्यटकांची संख्या बोटिंगसाठी घेतली जाते ही अत्यंत गंभीर बाब आहे, याची महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी तातडीने दखल घेवून बोटिंग दरम्यान सुरक्षा जॅकेट व नियमांचे पालन न केल्यास संबंधितांवर बोटींग सेवा बंद करण्याची कारवाई केली जाईल असा इशारा दिला आहे.

मासुंदा तलाव हे ठाणेकरांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू. शनिवार, रविवार तसेच सुट्टयांच्या दिवशी या तलावांवर बोटींगसाठी नागरिकांची प्रचंड गर्दी असते. सध्या महापालिका क्षेत्रात प्रमुख चार तलावांमध्ये बोटिंग सेवा ठेकेदारामार्फत सुरू आहे. परंतु पर्यटकांना कोणत्याही प्रकारची सुरक्षा न पुरविता पेडल बोट उपलब्ध करुन दिल्या जातात. तसेच प्रवासी बोटीत क्षमतेपेक्षा जास्त पर्यटक बसविले जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याबाबत आवश्यक ती खातरजमा करुन योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी महापालिकेच्या पर्यावरण विभागाला दिले होते. त्यानुसार मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी मासुंदा व उपवन तलावाला भेट देवून प्रत्यक्ष वस्तुस्थितीची पाहणी केली. दरम्यान मासुंदा तलावात बोटिंग करताना क्षमतेपेक्षा जास्त पर्यटकांना प्रवासी बोटीत बसविणे, तसेच बोट तलावात असताना बोटीमध्ये सुरक्षा जॅकेटस् व इतर सुरक्षिततेची साधने दिसून आली नाहीत. ही बाब गंभीर स्वरुपाची असून पर्यटकांचा जीव धोक्यात घालणारी आहेत याबाबत संबंधित ठेकेदाराला सक्त सूचना देण्यात आल्या असून बोटींगमध्ये सुरक्षा जॅकेट घातल्याशिवाय बोट पर्यटकांच्या ताब्यात देवू नये, तसेच याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी बोटींग परिसराच्या दर्शनी भागात नियमावली लावण्याच्या सूचना आयुक्त बांगर यांच्या निर्देशानुसार प्रदुषण नियंत्रण अधिकारी मनिषा प्रधान यांनी मासुंदा व उपवन तलाव येथील बोटिंग सेवा चालविणाऱ्या ठेकेदाराला दिल्या आहेत.

# जूनमध्ये मुख्यमंत्री दिव्यात येणार?

**दिवा:**-दिवा शहरातील विविध विकासकामांचे लोकार्पण व प्रस्तावित प्रकल्पांच्या भूमिपूजनासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे जून महिन्यात दिवा शहरात येणार असल्याची माहिती मिळते.

दिवा शहरात मागील पाच वर्षात झालेल्या विविध विकास कामांचे लोकार्पण जून महिन्यात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती याआधीच शिवसेनेचे दिवा शहर प्रमुख रमाकांत मढवी यांनी दिली होती.

दिवा शहरातील पाणी वितरण व्यवस्था, मुख्य रस्ते, आगासन देसाई खाडी ब्रिज यासह अन्य प्रस्तावित प्रकल्पांचे भूमिपूजन व लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार असे रमाकांत मढवी यांनी याआधी जाहीर केले होते.येत्या जूनच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दिवा शहरात येणार असून येथील विविध विकास कामांचे लोकार्पण त्यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती मिळत आहे.

## ठामपातील उद्याने व मैदानांची होतेय वर्षानुवर्षे ठाण मांडून बसलेल्या अधिकाऱ्यांमुळे दुरावस्था

### आमदार सरनाईकांचा आरोप

**ठाणे:** एका बाजूला नवी मुंबई महानगरपालिकेची उद्याने सुस्थितीत असताना दुसऱ्या बाजूला 'ड'' वर्ग महानगरपालिका असलेल्या मिरा-भाईंदर महानगरपालिकेची उद्याने मात्र सुस्थितीत आहेत. कारण या ठिकाणी महानगरपालिकेच्या उद्यानांची व मैदानांची निगा व देखभालीची जबाबदारी उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांना न देता तेथे वार्षिक ठेकेदाराकडून ही उद्याने व मैदाने दुरूस्ती केली जातात. तर ठाणे महानगरपालिकेतील उद्यान व वृक्ष प्राधिकरणातील गेल्या अनेक वर्षांपासून ठाण मांडून बसलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमुळे दुरावस्था झाल्याचा आरोप आमदार प्रताप सरनाईक यांनी करत, त्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना इतर खात्यामध्ये बदली करून हा विभाग कायमचा बंद करावा व मिरा-भाईंदर महानगरपालिकेप्रमाणे वार्षिक ठेकेदारामार्फत या उद्याने व मैदानांची दुरूस्ती व देखभाल करावी, अशी मागणीही आमदार सरनाईक यांनी आयुक्त बांगर यांच्याकडे केली आहे.

ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये अनेक उद्याने व मैदाने असून त्यांची देखभाल व दुरूस्ती महानगरपालिकेचे उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाचे अधिकारी व कर्मचारी करीत असतात. परंतू, गेल्या अनेक वर्षांपासून लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत असताना माझ्या असे निर्दशनास आले की, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना नवीन उद्याने व दुरूस्तीच्या निविदा तसेच विकासकांच्या माध्यमातून झाडे तोडण्यासाठी आलेल्या कामांव्यतिरिक्त दुसऱ्या कामांमध्ये म्हणजेच उद्याने व मैदाने यांची योग्य प्रकारे निगा व काळजी घेण्याची इच्छा नसल्याचे जाणवते. त्याचबरोबर कर्मचाऱ्यांना कुठल्याही प्रकारचे प्रशिक्षण नसल्याने तसेच कामचुकारपणा या कर्मचाऱ्यांमध्ये वाढल्याने महानगरपालिका हद्दीतील उद्यानांची व मैदानांची दुरावस्था झाल्याचा आरोप सत्ताधारी आमदार आमदार प्रताप सरनाईक यांनी केला आहे. तसेच याबाबत महापालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे.

ठाणे महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न अतिशय चांगले नसताना देखील कोरोनाच्या भीषण परिस्थितीनंतर अभिजित बांगर यांनी आयुक्त पदाची सुत्रे हाती घेतल्यापासून करोडो रूपयांचे कर्ज फेडून महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा आणत आहात. तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे शहराच्या सुशोभिकरणासाठी करोडो रूपयांचा निधी दिलेला आहे. राज्य शासनाने दिलेल्या निधीचा योग्य प्रकारे वापर करीत असताना उद्यान विभागामार्फत मात्र आपणांस सहकार्य मिळत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून काही अधिकारी ठाण मांडून बसले आहेत असा आरोप करत त्या अधिकाऱ्यांचा नाकर्तेपणामुळे ठाणे महानगरपालिकेची वारंवार बदनामी होत आहे. असे ही आमदार सरनाईक यांनी म्हटले आहे. ठाणे शहराचे लोकप्रतिनिधी म्हणून उद्यानांचे उद्घाटन केल्यानंतर त्यांच्या दोन-तीन महिन्यांनंतरच त्यांची दुरावस्था झालेली आढळून येत आहे.

## लोकसहभागातून उभा राहणार आदर्श नाला बांधणी प्रकल्प



### आमदार संजय केळकर यांच्या हस्ते नाले दत्तक योजनेचे भूमिपूजन

**ठाणे:** समस्या, दुर्गंधी आणि भ्रष्टाचाराचे कुरण ही नाल्यांची ओळख आता संपुष्टात आणण्यासाठी ठाणे शहराचे आमदार संजय केळकर यांनी पुढाकार घेतला आहे. तसेच त्यांच्या संकल्पनेनुसार आणि मार्गदर्शनाखाली जागर फाऊंडेशन या संस्थेच्या माध्यमातून ठाणे शहरातील डॉ.मूस मार्गालगत असलेला आदर्श नाले बांधणी प्रकल्प आणि नाले दत्तक योजना राबवण्यात येत आहे. त्यांचे भूमिपूजन शुक्रवारी करण्यात आले. त्यामुळे भविष्यात शहरातील नाले दत्तक योजनेचे ठाणे पॅटर्न म्हणून नावारूपास येईल. नालेसफाई तील हात सफाईला मोठ्या प्रमाणात ब्रेक बसेल, असे बोलले जात आहे.



दरवर्षी नालेसफाई, त्यातून होणारा भ्रष्टाचार याबाबत आमदार संजय केळकर सातत्याने आवाज उठवत आहेत. याचबरोबर त्यांनी यावर रामबाण उपाय म्हणून आदर्श नाले बांधणी प्रकल्प आणि नाले दत्तक योजना ही संकल्पना देखील ठाण्यात रुजवली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जागर फाऊंडेशन या संस्थेने ठाणे महापालिकेकडे प्रस्ताव दाखल केल्यानंतर आयुक्त अभिजित बांगर यांनी उपक्रमाचे कौतुक करीत तातडीने मंजुरीही दिली. ही योजना लोकसहभागातून राबवण्यात येत असून ठाण्यातील विकासक मे. बोरकर रिअल्टी याकामी सहकार्य करत आहेत.

नंदिनी बोरकर-सारंगधर यांनी आदर्श आणि आधुनिक पद्धतीच्या नाले बांधणीचा आराखडा तयार केला आहे. सुमारे ९० मिटर लांबीचे आवरण या नाल्यावर चढविण्यात येणार असून दोन्ही बाजूला व्हर्टीकल गार्डन करण्यात येणार आहे. परिसरात मोठा कचरा येणार नाही, अशी बांधणी करण्यात येणार आहे. या योजनेचा फायदा येथील दीपक सोसायटी, जीवन शांती सोसायटी आदी संकुले आणि आजूबाजूच्या इमारतींना होणार आहे.

नाले दत्तक योजना ही अन्य ठिकाणीही फायदेशीर ठरणार असून जागर फाऊंडेशनप्रमाणे याकामी अन्य संस्था आणि नागरीकांनी पुढे आल्यास नाले ही समस्या राहणार नाही. दरवर्षी नाले सफाईतून होणारा भ्रष्टाचार थांबू शकतो. आयुक्तांनी या उपक्रमास तातडीने हिरवा कंदील देऊन दूरदृष्टी दाखवली तर बोरकर रिअल्टीने घेतलेली भूमिकाही कौतुकास्पद आहे, असे आमदार संजय केळकर यांनी भूमिपूजन झाल्यानंतर सांगितले.

यावेळी आमदार संजय केळकर यांच्यासह बोरकर रिअल्टीचे महेश बोरकर, माजी नगरसेवक सुनेश जोशी, नंदिनी बोरकर-सारंगधर, जागर फाऊंडेशनचे अध्यक्ष सुरेश सोंडकर, सचिव विनोद येतुस्कर, जयश्री रामाणे, विनोद पितळे, दीपक सोसायटी, जीवन शांती आदी गृहसंकुलांतील पदाधिकारी उपस्थित होते.

# ठेकेदार-अधिकाऱ्यांचे नालेसफाईत 'हात ओले'





## भाजपने नाले सफाईचे पितळ पाडले उघडे

**ठाणे:** शहरातील नालेसफाई ७० टक्के पूर्ण आहे असा दावा ठाणे महापालिकेने केला. त्या दाव्याची पोलखोल भाजपने केली आहे. भाजपने केलेल्या नाले पाहणी दौऱ्यात ठेकेदार आणि अधिकाऱ्यांची हाथ की सफाई उघडी पाडली. एकीकडे आयुक्त अभिजित बांगर प्रयत्न करत असले तरी ठेकेदार आणि अधिकारी त्यांचे ते प्रयत्न हाणून पाडत असल्याचा आरोप शिंदे - फडणवीस सरकारमधील सत्ताधारी आमदार संजय केळकर यांनी केला आहे.

आमदार संजय केळकर यांच्या नेतृत्वाखाली आज शहरातील नाले सफाईची पाहणी करण्यात आली. यावेळी भाजपचे शहर अध्यक्ष आमदार निरंजन डावखरे आणि पदाधिकारी उपस्थित होते. माजिवडे येथील नाला कचऱ्याने तुंबला असून पावसाळा तोंडावर असतानाही या नाल्याची सफाई झाली नसल्याचे यावेळी प्रखरतेने आढळून आले.

ठाणे महापालिकेने नालेसफाईसाठी १० कोटींचा निधी दिला असून सध्याची नाले सफाई पाहता ठाणेकरांच्या या पैशांची खुलेआम लूट होत असल्याचा आरोप आमदार केळकर यांनी यावेळी केला. एकीकडे आयुक्त अभिजित बांगर प्रयत्न करत असले तरी ठेकेदार आणि अधिकारी त्यांचे ते प्रयत्न हाणून पाडत असल्याचा आरोपही केळकर यांनी केला. दुसरीकडे ठाणे महापालिकेने नाले सफाईच्या तक्रारींबाबत हेल्पलाईन जारी केली आहे. नागरीकांनी पुढाकार घेऊन याबाबत तक्रारी कराव्यात, अन्यथा पावसाळ्यात मोठा फटका बसल्याशिवाय राहणार नाही. अधिकारी आणि ठेकेदार यांच्या भ्रष्टाचाराचे नमुने आम्ही आयुक्तांच्या निदर्शनास आणून देणार आहोत, असेही आमदार केळकर यांनी शेवटी सांगितले.

# आदिवासी बांधवांच्या घरकुलांवरील कारवाई न थांबल्यास मंत्रालयावर मोर्चा काढणार - श्रमजीवीचा इशारा

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील प्रलंबित वन दावे मंजूर करण्यात यावे, आदिवासींच्या घरकुलावर वन विभागाकडून करण्यात येणारी तोडक कारवाई थांबवावी, वन पट्ट्यात वीज व बोरिंग मिळावी आदी मागण्यांसाठी मंगळवारी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर श्रमजीवी संघटनेच्यावतीने आंदोलन करण्यात आले. वन विभागाकडून होत असलेली कारवाई न थांबल्यास मंत्रालयावर मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा देखील श्रमजीवी संघटनेच्यावतीने देण्यात आला. यावेळी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांच्याकडे मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

गेल्या ४० वर्षापासून श्रमजीवी संघटना सातत्याने आंदोलन, सत्याग्रह करुन आदिवासींना वनाचा हक्क मिळावा यासाठी आग्रही भूमिका घेत आहे. केंद्रशासनाच्या अनुसुचित जमाती व अन्य पारंपारिक वन हक्काची मान्यता अधिनियम २००६ व नियम २००८ सुधारणा २०१२ हा कायदा अस्तित्वात आला. या कायद्याप्रमाणे आदिवासी व बिगर आदिवासी दावेदारांना त्यांना हक्काची वन जमीन मिळणे अपेक्षित असताना कायदा अस्तित्वात येऊन सुमारे १४ वर्षांचा काळ लोटला तरीही दावेदारांना वनाचा हक्क मिळालेला नाही.

ठाणे जिल्ह्यातील चारही उपविभागामध्ये वनहक्क दावेदारांना लाभ होईल अशी अमलबजावणी झाली नसल्याचे दिसून येत आहे. केंद्रशासनाच्या कायद्याच्या मुळ प्रस्ताविके मध्ये आदिवासी दावेदारांना भौतीक पुराव्यांच्या आधार घेऊन व जास्तीत जास्त संशयाचा फायदा देऊन आदिवासी दावेदारांना त्याचा लाभ होईल असे मुख्य उद्देश असताना शासनाच्या व जिल्हा प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे वन हक्कदावेदारांचा मोठ्या प्रमाणात आदिवासी व बिगर आदिवासी दावेदारांचे नुकसान होत असल्याचा आरोप श्रमजीवी संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.

दरम्यान, ठाणे जिल्ह्यातील आजही अनेक दावे प्रलंबित आहेत. तर, अनेक दावे नाकरण्यात आले असून ७५ वर्षांचा पुरावा सादर करण्यास सांगण्यात येत आहे. २००६ ला अक्यदा आल्यानंतर ग्राम पंचायत आणि ग्रामसभेत करण्यात आलेल्या ठरवत आदिवासी हे पिढ्यान पिढ्या जमीन कसणारे असून त्यांना वन दावे मिळावेत असा उल्लेख आहे. असे असताना, देखील प्रशासनाकडून याबाबत टोलवाटोलवी करण्यात येत असल्याचा आरोप श्रमजीवी संघटनेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अशोक सपाटे यांनी केला आहे. तसेच वन विभागात दावे मंजूर असल्याने त्या पट्ट्यात आदिवासी बांधवांसाठी घरकुले शासनाकडून मंजूर करण्यात आली आहे. या घरकुलांचे हप्ते थांबवून वन विभागाकडून त्यांच्या घरकुलांवर कारवाई करण्यात येत आहे. याकडे सरकारचे लक्ष घालावे. तसेच आमच्या मागण्यांवर सकारात्मक विचार करून योग्य ती करवाई करावी, अन्यथा मंत्रालयावर मोर्चा काढण्यात येईल असा इशारा देखील सपाटे यांनी यावेळी दिला.

# राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाच्या वसतीगृहाचे नुतनीकरणाचे काम दोन महिन्यात पूर्ण करावे

## - आयुक्त अभिजीत बांगर

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयात शिकत असलेल्या आणि छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात प्रशिक्षण घेणाऱ्या निवासी डॉक्टरांच्या वसतीगृह नुतनीकरणाचे काम जलदगतीने सुरू करण्यासाठी लवकरात लवकर निविदा प्रक्रिया पूर्ण करावी व संपूर्ण वसतीगृहाचे नुतनीकरण हे येत्या दोन महिन्यांत पूर्ण होईल या दृष्टीने नियोजन करावे असे निर्देश महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी नुकत्याच झालेल्या बैठकीत आरोग्य विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले आहेत.



या बैठकीत वसतीगृहाच्या नुतनीकरणाच्या कामाचा आढावा घेण्यात आला. तसेच माजिवडा येथील पोस्ट कोविड सेंटर वा शहर विकास आराखड्यातंर्गत राखीव असलेल्या जागेत विकसकाकडून प्राप्त होणाऱ्या १२ मजली इमारतीत महाविद्यालय सुरू करण्याबाबतच्या कामांबाबतही चर्चा करण्यात आली.

राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाची पाहणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी केली होती, त्यावेळी वसतीगृहाची दुरावस्था त्यांनी पाहून तेथील मुलांशी संवाद साधला असता मुलांनी वसतीगृह तसेच कॅन्टीनच्या समस्या त्यांच्याजवळ मांडल्या. सदरचे वसतीगृह हे निवासी डॉक्टरांसाठी असून रुग्णालयामध्ये चांगल्या रुग्णसेवा उपलब्ध करुन देण्यामध्ये या निवासी डॉक्टरांची फार मोठी भूमिका असते, त्यामुळे त्यांना चांगले वसतीगृह उपलब्ध करुन दिल्यास रुग्णसेवा सुधारण्यामध्ये मोठी मदत मिळणार आहे. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी निर्देश देवून अत्यंत चांगल्या अत्युच्च दर्जाच्या सुविधा निवासी डॉक्टरांना उपलब्ध करुन देणे गरजेचे असल्याचे नमूद केले.

मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार कळवा येथील राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय येथे असलेल्या वसतीगृहाच्या इमारतीचे नुतनीकरण प्रस्तावित करण्यात आले आहे. इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिटसह अंतर्गत भागाची दुरूस्ती, स्नानगृह, शौचालयांची पुरेशी संख्या, खोलीची अंतर्गत रचना कशी असेल, तसेच विद्यार्थ्यांसाठी कॉमनरुम तसेच कॅफेटेरियाची रचना आदी बाबींचा आढावा आयुक्त बांगर यांनी या बैठकीत घेतला.यासाठी आवश्यक असलेल्या वसतीगृहाच्या नूतनीकरण कामाची आखणी, निविदा प्रक्रिया लवकरात लवकर होईल या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या.


निवासी डॉक्टरांच्या वसतीगृहांमध्ये सुधारणा करुन डॉक्टरांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध कराव्यात तसेच नुतनीकरणासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची तात्काळ अंमलबजावणी केली जावी, यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आग्रही भूमिका असून त्या पध्दतीने सर्व कामे ही विनाविलंब करण्यासाठी सर्वांनी दक्ष रहावे असेही बांगर यांनी नमूद केले. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी, उपनगरअभियंता रामदास शिंदे, कार्यकारी अभियंता भगवान शिंदे आदी उपस्थित होते.

### वातानुकुलित वसतीगृहासह खोल्यांची संख्या वाढवावी

सद्यस्थितीत वसतीगृहात राहत असलेले विद्यार्थी व निवासी डॉक्टरांची संख्या ही २२१ इतकी आहे. २०४ विद्यार्थी राहू शकतील असा आराखडा तयार करण्यात आला असला तरी प्रत्यक्षात जागा अपुरी पडत असेल तर मुलींचे वसतीगृह वेगळे करण्यासाठी प्रयत्न करु. पण एकाच ठिकाणी जास्त गर्दी करणे योग्य नाही. नुतनीकरण करताना वसतीगृहाची संपूर्ण इमारत ही वातानुकूलित असावी, तसेच वसतीगृहातील खोल्यांची रचना करताना एका खोलीत दोन विद्यार्थी, त्यांच्यासाठी आवश्यक असलेले बेडस्, कपाटांची रचना, स्टडी टेबल तसेच खोलीत पुरेसा उजेड अशा पध्दतीने खोलीची रचना करण्याच्या सूचना आयुक्त बांगर यांनी या बैठकीत दिल्या.

### निवासी डॉक्टरांसाठी सोईसुविधा उपलब्ध कराव्यात

वसतीगृहाच्यासमोर आणि मागील बाजूस असलेल्या जागेचा वापर निवासी डॉक्टरांना क्रीडा सुविधा देण्यासाठी करावा. त्यांच्याशी चर्चा करून खेळासाठी लागणारी व्यवस्था उभी करावी, वसतीगृहालगतच्या मोकळ्या जागेत अभ्यास, मनोरंजन तसेच जिम आदी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच त्या सेवा कॅन्टीनशी जोडून घ्याव्यात असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.



वसतीगृहाच्या इमारतीच्या नुतनीकरणादरम्यान विद्यार्थ्यांना खेवरा सर्कल येथील महापालिकेच्या ताब्यात असलेल्या इमारतीमध्ये स्थलांतरीत करावे, तेथेही पाणी, लाईट आदी सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत कार्यवाही करावी.

शहर विकास आराखड्यातंर्गत राखीव असलेल्या जागेत विकसकाकडून महापालिकेस प्राप्त झालेल्या १२ मजली इमारतीत महाविद्यालय सुरू केले जाणार असून या ठिकाणी करण्यात येणाऱ्या कामाचा आढावाही आयुक्त बांगर यांनी या बैठकीत घेतला.

# जूनपासून ३१ जुलैपर्यंत पावसाळी मासेमारी बंदी



**ठाणे :** राज्याच्या सागरी क्षेत्रामध्ये १ जून २०२३ ते ३१ जुलै २०२३ या कालावधीमध्ये मासेमारी करण्यास बंदी लागू करण्यात आल्याचे आदेश मत्स्यव्यवसाय विभागाने दिले आहेत. तसेच पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करताना यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकेस अपघात झाल्यास अशा नौकेस शासनाकडून कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

मासळीच्या साठ्याचे जतन तसेच मच्छीमारांची जीवित व वित्त यांचे रक्षण करण्याच्या हेतूने महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ च्या कलम ४ च्या पोट कलम १ द्वारे प्राप्त अधिकारांचा वापर करून १ जून ते ३१ जुलै (दोन्ही दिवस धरून) राज्याच्या जलधी क्षेत्रात मासेमारी नौकांस पावसाळी मासेमारी बंदी घालण्यात आलेली आहे. असे आदेशात म्हटले आहे. या कालावधीत मासळीच्या जिवांना प्रजोत्पादनास पोषक वातावरण असते.

या कालावधीत मासेमारी बंदीमुळे मासळीच्या बीजनिर्मिती प्रक्रियेस वाव मिळून मासळीच्या साठ्याचे जतन होते. तसेच या कालावधीत खराब / वादळी हवामानामुळे होणारी मच्छिमारांची जीवित व वित्त हानी टाळता येणे शक्य होते. त्यामुळे या कालावधीत यांत्रिक मासेमारी नौकास मासेमारी बंदी लागू करण्यात आली आहे.

ही पावसाळी मासेमारी बंदी यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना लागू राहील. पावसाळी मासेमारी बंदी ही पारंपारिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या बिगर यंत्रचलित नौकांना लागू राहणार नाही. राज्याच्या सागरी जलधी क्षेत्राबाहेर (सागरी किनाऱ्यापासून १२ सागरी मैलपुढे) खोल समुद्रात मासेमारीस जाणाऱ्या नौकांस केंद्र शासनाच्या खोल समुद्रातील मासेमारीबाबतचे धोरण, मार्गदर्शक सूचना, आदेश लागू राहतील. राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात (सागरी किनाऱ्यापासून १२ सागरी मैलापर्यंत) यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांस पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करताना आढळल्यास, केल्यास महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा) २०२१ च्या कलम १४ अन्वये नौका व नौकेवर बसविलेली उपसाधने व मासेमारी सामुग्री आणि त्यामध्ये सापडलेली मासळी जप्त करण्यात येईल. तसेच कलम १७ मधील तरतुदी अन्वये जास्तीत जास्त कठोर शास्ती लादण्यात येईल, असे या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचा नऊ वर्षांचा कार्यकाळ

# दिव्यात केंद्र व राज्य शासनाच्या योजनांच्या शिबीराचे आयोजन





**दिवा:-** नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळाला नववर्ष पूर्ण झाल्याबद्दल केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचे शिबिर दिवा शहरात आयोजित करण्यात आले होते.

ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक ७९ येथे २४ मे ते २८ मे या पाच दिवसात हा लोकहिताचा कार्यक्रम दिवा भाजपने आयोजित केला होता.

या कार्यक्रमाला दिव्यातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद असून या योजनांचा नागरिक लाभ घेतला. यात प्रामुख्याने पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी,पंतप्रधान श्रमयोगी मानधन योजना,दिन दयाल अंत्योदय योजना, पंतप्रधान सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना, पंतप्रधान सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जन-धन योजना, प्रधानमंत्री ई-श्रम योजना, बचत गट नोंदणी व सवलतीत कर्ज पुरवठा अशा योजनांचा यात समावेश आहे. या योजनांचा नागरिकांना लाभ मिळावा म्हणून ठाणे शहर जिल्हाध्यक्ष व आमदार निरंजन डावखरे व ठाणे शहर आमदार संजय केळकर यांच्या नेतृत्वात दिवा मंडळात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाची प्रमुख जबाबदारी विनोद भगत, ज्योती पाटील,समीर चव्हाण, सतीश केळशीकर यांच्यावर देण्यात आली असल्याची माहिती दिवा मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांनी दिली. या योजनेचा दिव्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे दिवा भाजप कडून जनतेला आव्हान करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाला आज निरंजन डावखरे यांनी कार्यक्रम स्थली भेट दिली व मार्गदर्शन केले यावेळी ठाणे शहर जिल्हा उपाध्यक्ष नरेश पवार अशोक पाटील विजय भोईर ठाणे शहर ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष विनोद भगत, दिवा शहर मंडलाध्यक्ष रोहिदास मुंडे, संघटक सरचिटणीस दिलीप भोईर, सरचिटणीस समीर चव्हाण, रोशन भगत, नागेश पवार, रेश्मा पवार ,विद्यासागर दुबे, अवधराज राजभर, राहुल साहू प्रफुल साळवी राम पलट प्रजापती नितीन कोरगावकर निकिता सावंत रिता सिंग व ठाणे महानगरपालिकेचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## अखेर गणेश पाड्यातील 'त्या' गटाराचे काम पूर्ण

### मनसेचा प्रामाणिक पाठपुरावा

दिवा:- गणेश पाडा येथील वारंवार अपघात होणाऱ्या धोकादायक गटाराची दुरुस्ती अखेर झाली असून दिवा मनसेने प्रामाणिकपणे केलेल्या पाठपुराव्यामुळे येथील नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

गणेश पाडा येथून दातीवली समांतर रस्त्याला जोडणाऱ्या रस्त्याच्या मधोमध असलेल्या गटारावरील स्लॅब तुटल्यामुळे तिथून येणाऱ्या जाणाऱ्या दुचाकीस्वारांचे तोल जाऊन वारंवार अपघात घडत होते. दिवा मनसेच्या प्रयत्नांनंतर अखेर १९ मे रोजी या गटाराच्या कामाला सुरुवात करण्यात आली होती. अखेर आज हे गटार बांधून पूर्ण झाल्यानंतर गणेश पाड्यातील रहिवाशांनी दिवा मनसेचे आभार मानले आहेत.

## विविध मागण्यांसाठी महिलांचे ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर निर्दशने

### तहसील कार्यालयातून आश्वासनांच्या पलीकडे काही मिळत नाही संघटनेचा आरोप

**ठाणे:** विभक्त कार्डावर रेशन द्यावे, दोन आणि तीन रुपयांनी मिळणारे रेशन त्वरित सुरू करावे, मनरेगाची कामे त्वरित सुरू करावी, सुरू असलेल्या कामावरची ऑनलाइन हजेरी बंद करावी, हर घर नल, जल जीवन मिशन योजनेची अंमलबजावणी करावी, भरमसाठ येणारी वीज बिले कमी व्हावी अशा अनेक मागण्यांसाठी शुक्रवारी अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या वतीने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर निर्दशने करण्यात आली.

यावेळी महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. याप्रसंगी बोलताना आंदोलनकर्त्यांनी गेले कित्येक दिवस आपण आपल्या रेशन, रोजगार, पाणी, वीज या सर्व जीवनावश्यक मागण्या घेऊन तहसील कार्यालयावर मोर्चे, निदर्शने, विविध प्रकारे आंदोलने केली. पण तहसील कार्यालयातून आश्वासनांच्या पलीकडे फारसे काही पदरात पडले नाही. म्हणून आज जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर ही निर्दशने करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी अखिल भारतीय जनवादी महिला संघटना जिंदाबाद ! महिलांच्या एकजुटीचा विजय असो ! अशा घोषणा देण्यात आल्या.